सन २०१८-१९ अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभागासाठी निधी वितरण.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१८/प्र.क्र.१२२/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २२ मार्च, २०१९

वाचा

१. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१८ / प्र.क्र ६९ /अर्थ-३ ,दि.२५.०१.२०१९.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: निविप्र ४०१८ /प्र.क्र.१२२/क्रीयुसे -२; दि. १५.०९.२०१८.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: नासेस्प २०११ /प्र.क्र.३६१/क्रीयुसे -२; दि. ३०.०१.२०१२.
४. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: नासेस्प २०११ /प्र.क्र.३५६/क्रीयुसे -२; दि. ३१.०१.२०१२.
५. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: नासेस्प १४१३ /प्र.क्र.४२/क्रीयुसे -२; दि. २७.०२.१३.
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: नासेस्प ३८१४ /प्र.क्र.२७०/क्रीयुसे -२; दि. ०५.११.२०१४.
७. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक: अभानासे ३८१६/प्र.क्र.१७३/क्रीयुसे -२; दि. २०.०४.२०१७.

प्रस्तावना -

दर वर्षी राष्ट्रीय स्तरावर सुमारे १५ खेळांसाठी अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांचे देशातल्या विविध राज्यात आयोजन करण्यात येते. सदर स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी शासनाच्या वतीने अनुदान देण्यात येते. यास्तव सन २०१८-१९ या वर्षासाठीच्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीपैकी संदर्भ क्र.१ च्या शासन परिपत्रकानुसार ८० टक्केच्या मर्यादेत निधी वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या वर्षामध्ये अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धांमध्ये सहभाग या योजनेसाठी रु.२५.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित असून यापैकी रु. १७.५० लक्ष (रुपये सतरा लाख पन्नास हजार फक्त) इतका निधी संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार वितरित करण्यात आला आहे. उर्वरीत निधीपैकी रु. २.५० लक्ष (रुपये दोन लाख पन्नास हजार) इतका निधी वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च “मागणी क्र. ०३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ, (०६) (०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

३. वित्त विभाग दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत उपसंचालक /जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर संदर्भ क्र. ३ ते ७ वरील शासन निर्णयातील विवरणपत्र "ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे

५. वित्त विभागाच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग एक, अ.क्र. ५, नियम क्र. ३९(ब) (२) नुसार प्रशासकीय विभागाला दिलेल्या अधिकारा अन्वये सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२२१०४७४४८१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.27 14:51:53 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर

९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२).